# प्रेस नोट

ला.प्र.विभाग, भंडारा
दिनांक :- ११/१२/२०२५

आरोपी लोकसेवक प्रफुल रतनगीर गीरी, ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत विहीरगाव ता. मोहाडी, जि. भंडारा यांनी तक्रारदार यांचे वडीलांचे घराचे प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत घरकुल संबंधाने मोबाईल अॅप द्वारे माहे मे-२०२५ मध्ये सर्वे केले होते. त्या सेल्फ सर्वे यादी मध्ये तक्रारदार यांचे वडीलांचे नाव घरकुल यादी मध्ये पहिल्या टप्प्यात आणुन देण्या करीता आरोपी लोकसेवक यांनी १५,०००/- रुपयांची लाचेची मागणी केली. अशा आशयाचे प्राप्त तक्रारीवर पडताळणी कार्यवाही करण्यात आली असता, पडताळणी कार्यवाही मध्ये यातील आरोपी लोकसेवक यांनी तक्रारदार यांना लाच मागणी करुन स्विकारण्याची तयारी दर्शविल्याने आणि मागनी केलेली लाच रक्कम १५,०००/- रुपये तक्रारदार यांचे कडुन आरोपी लोकसेवक यांनी ग्रामपंचायत कार्यालय विहीरगाव येथे स्विकारल्याने आरोपी लोकसेवक प्रफुल रतनगीर गीरी, ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत विहीरगाव ता. मोहाडी, जि. भंडारा विरुध्द गुन्हा नोंद.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | भंडारा युनिट, नागपूर परीक्षेत्र |
| पोलीस ठाणे, गुन्हा नोंद क्र. | पोलीस स्टेशन मोहाडी, जि. भंडारा अप क्र. ३०९/२०२५ |
| कलम | कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम सन १९८८ (सुधारणा २०१८) |
| आरोपीचे नाव व कार्यालय | प्रफुल रतनगीर गीरी, ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत विहीरगाव ता. मोहाडी, जि. भंडारा |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | १५,०००/-रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | १५,०००/-रुपये |
| पडताळणी दिनांक | २८/११/२०२५ |
| सापळा दिनांक | ०४/१२/२०२५ |
| तपास अधिकारी | श्री नितेश देशमुख लाप्रवि भंडारा |
| थोडक्यात माहिती | तक्रारदार यांचे वडीललांचे घराचे यातील आरोपी लोकसेवक श्री प्रफुल रतनगीर गीरी वय- ४६ वर्षे रा. विहीरगाव, ता. मोहाडी, जि. भंडारा यांनी प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत घरकुल संबंधाने मोबाईल अॅप द्वारे माहे मे-२०२५ मध्ये सर्वे केले होते. त्या सेल्फ सर्वे यादी मध्ये तक्रारदार यांचे वडीलांचे नाव घरकुल यादी मध्ये पहिल्या टप्प्यात आणुन देण्या करीता आरोपी लोकसेवक यांनी १५,०००/- रुपयांची लाचेची मागणी केली. अशा आशयाचे प्राप्त तक्रारीवर पडताळणी कार्यवाही करण्यात आली असता, पडताळणी कार्यवाही मध्ये यातील आरोपी लोकसेवक यांनी तक्रारदार यांना लाच मागणी करुन स्विकारण्याची तयारी दर्शविल्याने आणि मागनी केलेली लाच रक्कम १५,०००/- रुपये तक्रारदार यांचे कडुन आरोपी लोकसेवक यांनी ग्रामपंचायत कार्यालय विहीरगाव येथे स्विकारल्याने सरकार तर्फे फिर्यादी श्री अरुणकुमार लोहार, पोलीस उपअधीक्षक, लाप्रवि भंडारा यांचे फिर्याद वरुन पोलीस स्टेशन मोहाडी अपराध क्र. ३०९/२०२५ कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम सन १९८८ (सुधारणा २०१८) प्रमाणे गुन्हा नोंद. |

सदरची कार्यवाही मा. डॉ. श्री दिगंबर प्रधान, पोलीस अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नागपूर, अपर पोलीस अधिक्षक मा. श्री विजय माहुलकर यांच्या मार्गदर्शनात, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग भंडारा विभागाचे पोलीस उप अधीक्षक, डॉ. अरुणकुमार लोहार, पोलीस हवालदार मिथुन चांदेवार, अतुल मेश्राम, पोलीस अंमलदार विष्णु वरठी, सुमेध रामटेके यांनी केली. तसेच आरोपी लोकसेवक यांची घरीझडती घेण्यात आली असुन सदरची कार्यवाही पोलीस निरीक्षक श्री नितेश देशमुख, पोलीस अंमलदार मयुर सिंगनजुडे, प्रतिक उके लाप्रवि भंडारा यांनी केली.

लोकसेवक शासकिय अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांच्या वतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करुन देणेसाठी कायदेशीर फी व्यतीरीक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काल लाचलुचपत प्रतिबंधक विभाग भंडारा कार्यालयास संपर्क साधन्याचे आवाहान डॉ. अरुणकुमार लोहार पोलीस उप अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग भंडारा मो. क्र. ९८७०३७६७०६ यांनी केले आहे.

**संपर्क पत्ता :-** कार्यालय पोलीस उप अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ए-२३, सिव्हील लाईन, भंडारा.

**संकेतस्थळ :-** www.acbmaharashtra.gov.in

**ई मेल :-** acbbhandara@gmail.com

**टोल फ्री क्रमांक :-** 1064

**दुरध्वनी क्रमांक :-** 07184-252661

कार्यालय पोलीस उपअधीक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो, भंडारा
सत्यमेव जयते

(डॉ. अरुणकुमार लोहार)
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, भंडारा